प्रेस नोट

दहिसर पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक ०७/१०/२०२६.

रात्रीच्या वेळी दुकानांचे कुलुप तोडुन तसेच शटर उचकटून चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करुन दहिसर पोलीस ठाणे येथील घरफोडीचे ०२ व कुरार पोलीस ठाणे येथील रिक्षा चोरीचा ०१ असे एकूण ०३ गुन्हे उघडकीस आणलेबाबत

दहीसर पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादीचे असलेल्या दाताच्या दवाखान्याचे दिनांक २९/०८/२०२६ रोजी ०९:३० ते दिनांक ३०/०८/२०२६ रोजी ०९:३० वाजेच्या दरम्यान ब्ल्यू पर्ल अपार्टमेंट, बिस्किटा नगर, विद्यामंदिर रोड, दहिसर पूर्व, मुंबई येथील लोखंडी शटर उचकटून व कुलुप तोडुन एक लॅपटॉप व रोख रक्कम ८०,०००/- रुपये ही अज्ञात चोरट्याने चोरी केले म्हणुन दहीसर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२८१/२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५ भान्यांस.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हा नोंद झाल्यानंतर मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक हेमंत गिते व त्यांचे पथकाने घटनास्थळाचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ची तपासणी केली असता तीन इसम हे एका रिक्षाने आले असून संशयास्परित्या सदर ठिकाणी वावरताना व गुन्हा केल्यानंतर पश्चीम द्रुतगती मार्गाने चेकनाका च्या दिशेने जाताना दिसल्याने त्या मार्गवरील सीसीटिव्ही फुटेज तपासण्यात आले. तसेच संशयीत आरोपी हे येण्याचा मार्ग व जाण्याचा मार्ग तपासून त्यावरील डम डाटा काढून तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. तांत्रिक विश्लेषणानंतर आरोपी निष्पन्न करण्यात आले व तिघांमधील एक आरोपी हा वसई परिसरात असल्याचे माहिती प्राप्त होताच त्यास रॉयल हब इंडस्ट्रीज, पोमन, जि पालघर येथून त्यास ताब्यात घेण्यात आले.

सदर आरोपीताकडे त्याचे साथीदार व गुन्ह्यात वापरलेल्या रिक्षा बाबत तपास केला असता त्याचे इतर दोन साथीदार हे सध्या मूळ गावी गेले असल्याचे सांगितले व गुन्ह्यात वापरलेली रिक्षा ही त्याच रात्री कुरार पोलीस ठाणे हद्दीतून चोरी केली असल्याचे कबुली दिली.

➞ हस्तगत मालमत्ता.:-

एक ऑटो रिक्षा क्र. **MH 47 AJ 2879** (कुरार पो ठाणे हद्दीतून चोरी केलेली)
उर्वरित मालमत्ता हस्तगत करीत आहोत.

➞ उघडकिस आलेले गुन्हे . १) दहिसर पोलीस ठाणे गुरक्र १२८२/२६ कलम ३३१(३),३३१(३),३०५ भा. न्या. स.
२) कुरार पोलीस ठाणे गुरक्र ९३०/२६ कलम ३३१(३),३३१(४),३०५ भा. न्या. स. २०२३

➞ अटक आरोपी याचा अभिलेख :-पेल्हार पोलीस ठाणे गुरक्र ४४६/२६ कलम ३३१(३), ३३१(४),३०५ भा. न्या. स.

अदयापर्यंत खालील पोलीस ठाणेचे गुन्हे हे उघडकिस आणण्यात आले आहे.
१) दहीसर पोलीस ठाणे ०२ गुन्हे
२) कुरार पोलीस ठाणे ०१ गुन्हा

अटक आरोपीताचे नाव व पत्ता:-

इरफान रफिक शेख, वय २४ वर्षे, धंदा: बस चालक, रा.ठी. रुम.नं.७, पाल चाळ, निरमल हॉयस्कुलच्या बाजुला, भोईदापाडा, वसई ईस्ट, वसई जि.पालघर

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री. शशिकुमार मीना, अप्पर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. श्री.गजानन राजमाने , पोलीस उप आयुक्त उत्तर परिमंडळ ०३, मा. श्री.जयराज रणवरे , सहायक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, मा. श्री. सर्जेराव पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक दहिसर पोलीस ठाणे, श्री मारुती संगळे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक हेमंत गिते, पो.ह. अमित पाटील, पो.ह. शहानवाज सय्यद, पो.ह. अमोल जाधव, पो.शि. सुशांत जाधव, पो.शि. कपिल चौधरी, पो.शि. महेंद्र महाले, पो.शि. ओमकार राणे व पो.ह. सागर पवार (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.

-----oooo------

Scanned with CamScanner